Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर -
416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/दुष्काळ-2025/फेब्रु-मार्च 2026/परीक्षा फी-प्रतिपूर्ती/ 1442 दिनांक : 20 / 04 / 2026

22 APR 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय** : अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे 31 अंशत : बाधित व 251 पूर्णत : बाधित तालुक्यातील इ.10 वी व इ.12 वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत.

**संदर्भ** : 1) शासन निर्णय क्र. सीएलएस.2025/प्र.क्र.365/म.3(मदत-1), दि. 10.10.2025
2) शासन निर्णय क्र. सीएलएस.2025/प्र.क्र.365/म.3, दिनांक 09.10.2025
3) शासन निर्णय क्र. संकिर्ण 2029/प्र.क्र.47/एसडी-5, दिनांक 01.08.2019
4) शा. शुध्दीपत्रक क्र. संकिर्ण 2029/प्र.क्र.47/एसडी-5, दिनांक 03.02.2020
5) शा. निर्णय क्र. एफईडी 1592/1002/(1132)/साशि-5, दिनांक 18.10.1993
6) राज्य मंडळ कार्यालयाचे क्र. रा.मं./लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती 25-26 / 1679 दिनांक 17.04.2026 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की, अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे 31 अंशत : बाधित व 251 पूर्णत : बाधित तालुक्यातील फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत (इ.10 वी) व उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / फी ची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने खालील सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. संदर्भिय क्र. 3 व 4 च्या शासन निर्णयानुसार अवर्षणग्रस्त भागातील इ. 10 वी व इ.12 वी च्या विद्यार्थ्यांच्या आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्य मंडळ स्तरावरून नियमित विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये NEFT/RTGS द्वारे करण्यात येणार आहे.
2. सन 2025-26 मध्ये 29 जिल्हयातील 31 अंशत : बाधित व 251 पूर्णत : बाधित असे एकूण 282 तालुक्यातील इ.10 वी व इ.12 वी च्या या योजनेस पात्र असलेल्या नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.
3. राज्य मंडळाने माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2026 मधील प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी साठी मंडळाच्या संकेतस्थळावर शाळा महाविद्यालयांनी आपल्या लॉगइन-पासवर्ड चा उपयोग करून लॉगइन करावे. अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Option तेथे उपलब्ध होईल. सदर माहिती भरण्याकरिता **सोमवार दिनांक** 20.04.2026 **ते शनिवार दिनांक** 02.05.2026 हा कालावधी देण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

4. राज्य मंडळाने उपलब्ध केलेल्या माहितीमध्ये नियमित विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, विद्यार्थ्याचे नांव, बॅंक खाते क्रमांक, बॅंक IFSC कोड, आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करून दिली आहे.
5. राज्य मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या पुढेच पात्र (Qualified) रकाना उपलब्ध केला असून त्यामध्ये (Qualified) असा शेरा संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद करावयाचा आहे.
6. पात्र विद्यार्थी निश्चित करताना संदर्भिय क्र. 3 व 5 च्या शासन निर्णयामध्ये नमूद पात्रता निकष आणि सन 2025 मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अंशत : बाधित / पूर्णत : बाधित तालुक्यांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
7. अंशत : बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळानांच ही योजना लागू आहे. त्यामुळे अंशत : बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळामधील विद्यार्थ्यांचीच माहिती भरावी.
8. पात्र नियमित विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भिय क्र. 3 व 4 च्या शासन निर्णयानुसार राज्य मंडळ स्तरावरून शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा NEFT / RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या / पालकांच्या आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या आधार संलग्न खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

तरी सर्व मुख्याध्यापक / प्राचार्यांनी उपरोक्त सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच कोणताही नियमित विद्यार्थी परीक्षा फी प्रतिपूर्तीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**(ए. एस. म्हेत्रे)**
**विभागीय सहसचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव** :

मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव** :

1. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
2. शिक्षणाधिकारी (माध्य), सातारा / सांगली / कोल्हापूर
   यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.